


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २९६, मंगळवार १३ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर तालुक्याच्या वतीने जरांगे पाटलांचे जल्लोषात स्वागत

## बेलवंडीफाटा,वाडेगव्हाण येथे साधला कार्यकर्त्यांशी संवाद

**पारनेर : प्रतिनिधी**

**संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांची मराठा आरक्षणाबाबत जनजागृतीसाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी शांतता रॅलीने आज, सोमवारी दुपारी साडेबारा वाजता नगर जिल्ह्यात प्रवेश केला.पारनेर तालुका अखंड मराठा समाजाच्या वतीने नगर जिल्ह्याच्या हद्दीवर,बेलवंडी फाटा येथे फटाक्यांच्या आतषबाजीत, जल्लोषात स्वागत करण्यात आले.या ठिकाणी त्यांनी काही मिनीटे कार्यकर्त्यांशी संवाद साधला.तब्येतीची काळजी घेण्याची विनंती कार्यकर्त्यांनी जरांगे पाटलांना केली.**

यावेळी मराठा सेवक डॉ.श्रीकांत पठारे,संजय वाघमारे,बाबूशेठ राक्षे, दत्तात्रेय आंबुले,संभाजी औटी,रामराव गाडेकर,मच्छिंद्र मते, सतिश वाघमारे,नंदकुमार दरेकर,रावसाहेब कासार,राजेश चेडे,दिलीप भालेकर,विठ्ठल मुंगसे,बाबासाहेब रेपाळे,सुरेश राक्षे,लव यादव, सुभाष वाळूंज, सुनील राक्षे आदी उपस्थित होते. पारनेर फाट्यावर राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंग मापारी,भाऊसाहेब गाजरे यांनी तर सुपे येथे सुखदेव पवार,योगेश रोकडे, सुरेंद्र शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांनी मनोज जरांगे यांचे स्वागत केले.

मनोज जरांगे पाटील यांचा ताफा सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास पुण्याहून नगरच्या दिशेने निघाला.रविवारी पूर्ण दिवस जरांगे पाटील पुणे येथे होते.रविवारी रात्री त्यांचा मुक्काम पुणे येथेच होता.त्यामुळे आजचा (सोमवार) पूर्ण दिवस नगर जिल्ह्यासाठी राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले होते.मनोज जरांगे पाटील नगर येथे वेळेवर पोहोचावेत हा हेतू त्यामागे होता.नियोजनाप्रमाणे जरांगे पाटील यांच्या वाहनांचा ताफा पुण्यावरून निघाल्यानंतर थेट नगर जिल्ह्याच्या हद्दीवर बेलवंडी फाटा येथे येऊन थांबला तेथे नगर जिल्ह्याच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.



■ संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे नगर जिल्ह्याच्या हद्दीवर बेलवंडी फाटा येथे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

### जरांगे पाटलांनी घेतली सुप्यात विश्रांती

मनोज जरांगे यांना सातारा येथील सभेत भाषण करताना अस्वस्थ वाटू लागले.बोलत असतानाच ते खाली बसले. त्यावेळी त्यांचे हात थरथरत होते.त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला त्यांना देण्यात आला होता.मात्र सातारा येथे उपचार घेतल्यानंतर त्यांनी विश्रांती घेण्याचे टाळले.रविवारी पुणे येथील रॅली आटोपल्यावर त्यांना सह्याद्री रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.तेथेही त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला देण्यात आला.मात्र जरांगे पाटील यांनी नगर येथे उपचारासाठी दाखल होतो असे सांगत आज, सोमवारी नियोजित कार्यक्रमानुसार नगरकडे प्रयाण केले. प्रवासादरम्यान थकवा जाणवू लागल्याने त्यांनी सुपे येथे काही काळ विश्रांती घेतली.दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास जरांगे यांच्या वाहनांच्या ताफ्याने नगरकडे कूच केले.

गेली ४२ वर्षे मराठा समाज आरक्षणासाठी लढा देत आहे.मात्र यश येत नाही.त्यामुळे आता देणारे सत्ताकेंद्र आपल्या ताब्यात असावे या निर्णयाप्रत समाज आला आहे.या आंदोलनाच्या माध्यमातून आपण केवळ मराठा समाजाच नव्हे तर मुस्लिम,धनगर,बंजारा, कैकाडी या समाजांसह बारा बलुतेदार समाजाचे विशेषतः आरक्षणाबाबतचे प्रश्न मांडतो.खरी समानता, पुरोगामित्व मराठा समाजाच्या आंदोलनात आहे. २९ ऑगस्ट रोजी आंतरवली येथे होणाऱ्या समाज बांधवांच्या बैठकीत आगामी विधानसभा निवडणूक लढवायची की नाही याबाबत निर्णय घेण्यात येईल.राज्यातील ११३ उमेदवार पाडायचेच,ते कोणते तेही २९ च्या बैठकीत कळेल.

**संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील**,मराठा आरक्षणाचे नेते.

### नगर -पुणे मार्गावर मोठा पोलिस बंदोबस्त

पुणे - नगर मार्गावर जरांगे पाटील यांच्या वाहनांचा ताफ कुठेही वाहतूक कोंडीत अडकू नये यासाठी संपूर्ण मार्गावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.मार्गावरील ज्या गावांमधून ताफा जाणार होता त्या गावांमध्ये विशेष दक्षता घेण्यात आली होती.

# पनवेल मतदार संघात पारनेर विधानसभेची हंडी!

■ नीलेश लंके प्रतिष्ठानचा यंदाही दहीहंडी उत्सव
■ पंधरा लाख ३३ हजार ३३३ रुपयांच्या बक्षिसांची लयलुट
■ खासदार नीलेश लंके आणि राणी लंके उपस्थित राहणार



**पनवेल : नाना करंजुले**

**विधानसभेची निवडणूक येत्या दोन अडीच महिन्यावर येऊन ठेपले आहे. त्यानुसार राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. वेगवेगळ्या पक्षांकडून यात्रा काढल्या जात आहेत. तर ठिकठिकाणी जोरदार तयारी सुरू आहे. त्यातच कामोठे येथून लोकसभेचे रणसिंग फुंकणारे खासदार नीलेश लंके पनवेल मतदारसंघांमध्ये पारनेर नगर विधानसभेची हंडी लावणार आहे. नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने २७ ऑगस्ट रोजी १५ लाख ३३ हजार ३३३ रुपयांची हंडी लावण्यात येणार आहे. पनवेलसह नवी मुंबई परिसरातील हा उत्सव आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार आहे.**

पनवेल हे कॉस्मोपॉलिटन शहर आहे. या ठिकाणी विशेष करून सिडको वसाहतीत देशाच्या कानाकोपऱ्यांबरोबरच घाटमाथ्यावरून अनेक जण नोकरी व्यवसाय निमित्त स्थायिक झाले आहेत. सातारा, सांगली, सोलापूर, पुणे याबरोबरच अहमदनगर जिल्ह्यातील मूळ रहिवासी येथे वास्तव्यास आहेत. त्यातली त्यात कामोठे स्थित पारनेरकरांची संख्या जास्त आहे. या ठिकाणी अडीच हजारांपेक्षा जास्त कुटुंब राहतात. ते प्रामुख्याने सी एच ए, ट्रान्सपोर्ट, फिशरी मध्ये काम करतात. त्याचबरोबर चाकरमानी सुद्धा येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे कामोठेला मिनी पारनेर म्हणूनही ओळखले जाते. या तालुक्यातील राजकारणात आणि समाजकारणामध्ये पनवेल स्थित पारनेरकरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.ग्रामपंचायत पासून ते लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत त्यांना विचारात घेतल्याशिवाय निवडणूक लढणे सोपस्कार होत नाही.

दरम्यान खासदार नीलेश लंके यांचा कामोठेतील पारनेरकरांवर प्रभाव आहे. त्यांनी २०१९ ला विधानसभा निवडणुकीचे रणसिंग कामोठे येथे सभा घेऊनच फुंकले होते. त्याचबरोबर तीन महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसाहतीमध्ये भव्य मेळावा घेऊन त्यांनी मुंबईकरांना साद घातली होती. त्यानंतर प्रतिस्पर्धी उमेदवार डॉ. सुजय विखे यांनीही या ठिकाणी सभा घेऊन येथील पारनेर नगरकरांना गोंजारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र चाकरमानी आणि व्यावसायिक खासदार लंके यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिले.

आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये पारनेर नगर मतदार संघातून लंके यांच्या पत्नी राणी लंके यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळणार हे जवळपास निश्चित झाले आहे. आणि योगायोगाने दहीहंडी उत्सव सुद्धा जवळ आला आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरता सर्वात मोठ्या रकमेचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

कामोठे येथील लोकनेते दि.बा पाटील मैदानावर हा उत्सव साजरा केला जाणार आहे. यावेळी मुंबईसह परिसरातील गोविंदा पथकांना निमंत्रित करण्यात आले आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडी उत्सवाला खासदार नीलेश लंके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य राणीताई लंके, प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष सुदाम पवार, सचिव ॲड. राहुल झावरे, अहमदनगर जिल्हा अध्यक्ष कारभारी पोटघन, तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी, उद्योजक संजय लाकूडझोडे, प्रसाद नवले यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

### महिनाभरापासून जोरदार तयारी सुरू!

नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबईच्या दहीहंडी उत्सवाचे जवळपास महिनाभरापासून जोरदार तयारी सुरु झाली आहे. प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि स्वयंसेवक सक्रिय झाले आहेत. याकरता जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आले असून दहीहंडी उत्सव हा भव्य दिव्य स्वरूपात व्हावा या उद्देशाने निलेश लंके प्रतिष्ठानचे मुंबई अध्यक्ष सुरेश धुरपते, कार्याध्यक्ष गोरक्ष आहेर, सचिव नितीन चिकणे, खजिनदार दिनेश घोलप यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी सदस्य परिश्रम घेत आहेत.

नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबई गेल्या अनेक वर्षांपासून पनवेल सह, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, बोईसर, कल्याण आणि इतर परिसरामध्ये संघटितपणे सामाजिक क्षेत्रात काम करत आहे.. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून तसेच मतांचे राजकारण आम्ही कधीही केले नाही आणि आमचा तो प्रांत ही नाही. प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. दर वर्षाप्रमाणे यंदाही भव्य दिव्य दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सर्व पारनेरकर एकत्रित यावे त्याचबरोबर आपली संस्कृती आणि परंपरा जतन व्हावे हा या पाठीमागचा उद्देश आणि हेतू आहे.

**सुरेश धुरपते**
अध्यक्ष,नीलेश लंके प्रतिष्ठान मुंबई

# महायुतीची विधानसभेसाठी लगबग!

■ पारनेरात मंगळवारी कार्यकर्ता संवाद मेळावा
■ सरकारी योजनांबरोबरच निवडणूकीचाही आढावा
■ तीनही घटक पक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**लवकरच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूकीनिमित्त महायुतीमधील घटक पक्ष ॲक्शन मोडवर आले असून आठ दिवसांपूर्वी पार पडलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर आता मंगळवारी पारनेरात कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात सरकारी योजनांसह विधानसभा निवडणूकीवरही मंथन करण्यात येणार आहे.**

पारनेर शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, लाडकी बहिण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी



गठीत करण्यात आलेल्या समितीचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, शिवसेनेचे तालुकाप्रमुख विकास रोहोकले, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी दिली.

या मेळाव्यासंदर्भात बोलताना सांगण्यात आले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री उर्वरीत पान ३ वर

# सोयाबीन व कापूस उत्पादकांना १ ते १० हजारांचे अर्थसहाय्य

## खा. नीलेश लंके यांची माहिती संमतीपत्र व ना हरकत पत्र देण्याचे आवाहन

**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्यातील सन २०२३च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतऱ्यांना अर्धा एकरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार तर २ हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रासाठी १० हजार रूपये अर्थसहाय्य देण्यात येणार असल्याची माहिती खा. नीलेश लंके यांनी पत्रकारांना दिली. या अर्थसहाय्यासाठी उत्पादक शेतऱ्यांनी संमतीपत्र व सामायिक खातेदार ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन खा. लंके यांनी केले आहे.**



खा. लंके यांनी सांगितले की, विविध कारणांमुळे झालेल्या किंमतींमधील घसरणीमुळे सोयाबीन व कापूस उत्पादकांना नुकसान सोसावे लागले होते. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सोयाबीन व कापूस उत्पादकांना मदत करावी उर्वरीत पान ३ वर

# ओव्हरफ्लोचे पाणी मुळा उजव्या कालव्यात सोडा

## खा. नीलेश लंके यांचे कार्यकारी अभियंत्यांना पत्र

**नगर : प्रतिनिधी**

**मुळा धरणाच्या सांडव्याद्वारे नदी पात्रामध्ये ओव्हरफ्लोचे पाणी नदी पात्रात सोडण्यात येत असून वाहून जाणारे हे पाणी मुळा उजव्या कालव्याला सोडण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**



खा. लंके यांनी आपल्या पत्रात नमुद केले आहे की, मुळा उजवा कालव्याचे लाभक्षेत्र असलेल्या राहुरी, नेवासा, शेवगांव व पाथर्डी तालुक्यामध्ये अत्यल्प पाउस झाल्याने पाण्याची पातळी खालावलेली आहे. सद्यस्थितीमध्ये मुळा धरणातून ओव्हफलोचे पाणी नदीपात्रात सोडण्यात येत असून हे पाणी नदीपात्रातून वाहून जात आहे. वाहून जाणारे हे पाणी मुळा उजव्या कालव्याला सोडल्यास लाभ क्षेत्रामध्ये असलेल्या उभ्या पिकास फायदा होउ शकतो. तसेच पाणी पातळीमध्येही वाढ होउ शकते असे खा. लंके यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

मुळा धरणाची एकूण साठवण क्षमता २६ हजार दशलक्ष घनफुट, २६ टीएमसी इतकी असून सोमवार दि.१२ ऑगस्ट रोजी धरणाच्या परिचालन सुची नुसार १ ते १५ ऑगस्ट दरम्यान किमान पाणीसाठी २१ हजार २६४ दशलक्ष घनफुट तर कमाल पाणीसाठा २२ हजार ८१४ दशलक्ष घनफुट इतका नियंत्रीत ठेवणे आवष्यक आहे. त्यामुळे सोमावर दि. १२ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता धरणातून २ हजार क्युसेक्सने नदीपात्रात पाण्याचा सोडण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवष्यकता भासल्यास धरणातून टप्प्या टप्प्याने विसर्ग वाढविण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी सांगितले.

**नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

नदी पात्रातून २ हजार क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग सोडण्यात येत असून आवष्यकता भासल्यास विसर्ग वाढविण्यात येणार असल्याने उर्वरीत पान ३ वर






# चंदेरी

# प्रतीक्षेनंतच मिळते गोड फळ!

## आहाना कुमराने केले बॉलीवूड इंडस्ट्रीबद्दल रोचक खुलासे...



**दीड दशकापासून हिंदी चित्रपटसृष्टीत सक्रिय असलेली आहाना कुमरा इंडस्ट्रीतील कोणत्याही गटाचा भाग बनलेली नाही किंवा तिला बनण्याची इच्छाही नाही. ती संयमाची कदर करते आणि थोड्या प्रतीक्षेनंतर त्याचे गोड फळ अनुभवते. अलीकडेच, अहाना लखनऊला आली, जिथे तिने ऑडिशन, ग्रुप्स, कॉमेडी यातून इंडस्ट्रीमध्ये बाहेरचे असण्याचे तोटे उघडपणे सांगितले. कलाक्षेत्रात सध्या ऑडिशन्स एक विनोद बनला आहे, कारण ते आमच्याकडून ऑडिशन घेतात, पण शेवटी फक्त मोठ्या अभिनेत्रीच फायनल करतात, अशी टिप्पणीही आहानाने केली...**




या वेळी दिलेल्या विशेष मुलाखतीत आहानाने सांगितले, की मधल्या काळात मी दोन वर्षे काम केले नाही. पण त्यानंतर रजत कपूर आणि पूरब कोहलीसोबत डेहराडूनमध्ये महिनाभर शूटिंग केले. हा चित्रपट आजच्या पालकांना आणि मुलांना डोळ्यासमोर ठेवून बनवण्यात आला आहे. आजकाल आई-वडिलांमध्ये अनेक मतभेद पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत त्यांच्या भांडणात सहा-सात वर्षांचे मूल भरडले जात असते. आजकाल घटस्फोटही अगदी सामान्य झाले आहेत. मी आईची भूमिका साकारत असून पूरब वडिलांची भूमिका साकारत आहे, तर रजत कपूर माझ्या वडिलांची भूमिका साकारताना दिसणार आहे. आईची भूमिका साकारताना मला भीती वाटत नाही. जर मी आता आईची भूमिका केली नाही तर ८० व्या वर्षात करेन का? आजच्या हिरोइन्सना अशा स्टिरिओटिपिकल भूमिकांमध्ये अडकायचे नसते. मी नेहमीच काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करते. मी कधीच आईची भूमिका केली नव्हती. मला कथा आणि कलाकार आवडले म्हणून मी लगेच तयार झाले. याशिवाय मी एक ॲक्शन मालिकाही करत आहे, असे आहाना म्हणाली.

### घराणेशाही सगळीकडेच...

आहाना म्हणाली, की चित्रपटसृष्टीत लोक फक्त आपल्या मुलांना काम मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. अर्थात असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे घराणेशाही नाही... कलाक्षेत्रात पहिल्यांदाच काम मिळणे अवघड आहे. विशेषतः मुलींसाठी. मला पहिल्यांदा काम मिळायला लागेपर्यंत १० वर्षे उलटून गेली होती. आजचा काळ असा आहे की, मोठ्या नियतकालिकांमध्ये प्रतिष्ठित व्यक्तींच्या मुलांची छायाचित्रे छापली जातात, तर आपल्यासारख्या बाहेरच्या लोकांपर्यंत पोहोचायला १०-१५ वर्षे लागतात. महिलांसाठी परिस्थिती अधिक कठीण आहे. कारण त्यांच्यासाठी भूमिका लिहिल्या जात नाहीत. ज्या काही चांगल्या भूमिका लिहिल्या जातात त्याही कुणाच्या तरी मुलीला, कुणाच्या भाचीला किंवा निर्मात्याच्या नातेवाईकाला दिल्या जातात. मी दोन वर्षे काम केले नाही. मी घरीच बसून राहिले. लोक म्हणाले कोणतेही काम हाती घे. मी म्हणाले का घेऊ? ही माझी इच्छा आहे, मी ते करणार नाही. मी आजवर चांगले काम केले आहे, भविष्यातही चांगले काम करेन. वाट बघायला माझी हरकत नाही. खरं तर, वेटिंग गेम कलाकारांसाठीच बनवला जातो. येथे जितका संयम ठेवाल तितके गोड फळ मिळेल. आता संयमाची फळे गोड मिळत आहेत, असेही आहानाने सांगितले.

### मी अभिनेता आहे, नेता नाही...

फार पूर्वी मुझफ्फरनगरमधील एक पक्ष मला तिकीट देत होता. मला हसू फुटले. सुरुवातीला मला वाटले की हा एक विनोद आहे. तेव्हा तो गंभीरपणे म्हणाला की आम्हाला खरेच तुम्हाला तिकीट द्यायचे आहे. मी म्हणालो का देत आहेस मला? मी अभिनेता आहे, नेता नाही. वेळ मिळेल तेव्हा सामील होऊ पण आता नाही. माझी आई पोलिसांत आहे. आमच्या घरात दिवसभर राजकारणाचीच चर्चा असते. आपण फक्त बातम्या आणि राजकारण बघतो. आमच्या घरात हे वाद-विवाद सुरू असतात, असेही आहानाने सांगितले.



### मी कोणत्याही गटाची भाग नाही आणि होणार नाही...

आहानाने सांगितले, की मी आधीही नव्हते, आताही नाही आणि भविष्यातही मी कोणत्याही गटाचा भाग होणार नाही. सगळ्यांनाच वाटतं की तुम्ही मोठ्या लोकांच्या पार्ट्यांमध्ये जाल, त्यांच्यासोबत सोशलाइज कराल, डिनर कराल, पण माझ्याकडे या सगळ्यासाठी वेळ नाही. मधल्या काळात मी काही काम केले नाही. मी फक्त संपूर्ण भारताचा दौरा केला. भारताला भेट देऊन खूप मजा आली. कारण आपल्यासारखा दुसरा देश नाही. दक्षिण आणि उत्तर किती वेगळे आहेत? सगळीकडे नवी संस्कृती, नवी संस्कृती आहे. जेवणही ठिकाणानुसार बदलते. मी जगभर फिरले आहे पण भारतातील आदरातिथ्य इतरत्र कुठेही नाही. ट्रॅव्हल शो दरम्यान मला नवीन लोकांना भेटण्याची आणि नवीन कथा ऐकण्याची संधी मिळाली. मी एक वर्ष फक्त प्रवास केला.

### लोकांना वाटते की नायिका विनोदी नसतात...

आहाना म्हणाली, की प्रेक्षकांना रडवणे सोपे आहे पण हसवणे कठीण आहे. जेव्हा मी सँडविच फॉरएव्हर शो केला तेव्हा माझ्या टीममध्ये माझ्याकडे अतुल कुलकर्णी होता, ज्यांना कधीही कॉमेडीची ऑफर आली नव्हती. मला एक चांगला कॉमेडी शो मिळाला हे मी स्वतःला भाग्यवान समजते. खरे तर असे शो येणे सोपे नसते. लोकांना वाटते की मुली मजेदार नसतात, विशेषतः नायिका. आम्ही सँडविच... केल्यावर अतुल भावूक झाला होता. तो म्हणाला, अरे यार, मला विनोदी भूमिका कोणी देत नाही. मी म्हणायचो, अशा भूमिकाही मला कुणी देत नाही. आम्हा दोघांची कथा एकच आहे. आम्ही झाकीर भाई, दिव्या सेठे, अतुल, कुणाल, लेखक भरत कुकरेजा आणि पंकज सुधीर मिश्रा यांचा एक सुंदर ग्रुप तयार केला. आता आम्ही एकमेकांना सँडविच म्हणतो. आम्ही ते कोविडदरम्यान शूट केले आणि लोकांनी ते फक्त कोविड दरम्यान पाहिले.

# रिधिमा डिसेंबरमध्ये शुभमन गिलसोबत करणार लग्न ? काय आहे सत्य...



**टेलिव्हिजन अभिनेत्री रिधिमा पंडितबद्दल बातम्या आल्या होत्या की ती क्रिकेटर शुभमन गिलसोबत लग्न करत आहे. अखेर तिने आपण शुभमन गिलसोबत लग्न करत नसल्याचे स्पष्ट केले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये रिधिमा आणि शुभमन विवाहबंधनात अडकणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. अशा चर्चेत तथ्य नसल्याचे रिधिमाने स्पष्ट केले आहे.**

रिधिमाने नुकताच तिच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यात तिने म्हटले आहे, की मला अनेक पत्रकारांचे कॉल येत होते. त्यांना माझ्या लग्नाबद्दल जाणून घ्यायचे होते. मी लग्न करत नाही आणि जर माझ्या आयुष्यात इतकं महत्त्वाचं काही घडत असेल तर मी स्वतः पुढे येऊन त्याची घोषणा करेन. या बातमीत अजिबात तथ्य नाही, असे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले. शुभमन गिलने लग्नाच्या चर्चेवर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. याआधी अफवा पसरल्या होत्या की तो क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकरला डेट करत आहे. रिधिमा आणि शुभमनचे लग्न डिसेंबर २०२४ मध्ये जयपूर (राजस्थान) येथे होऊ शकते. दोघेही त्यांच्या लग्नाला गुप्त ठेवू इच्छित आहेत. या कथित लग्नात फोन आणि मीडिया कव्हरेजला परवानगी दिली जाणार नाही, अशाही अफवा पसरल्या होत्या.

### कोण आहे रिधिमा

बहु हमारी रजनीकांत आणि खतरा खतरा सारख्या टेलिव्हिजन शो व्यतिरिक्त, रिधिमा २०२१ मध्ये बिग बॉस ओटीटी सीझन १ मध्ये देखील दिसली आहे. २०१९ मध्ये तिने फियर फॅक्टरः खतरों के खिलाडी ९ मध्ये देखील भाग घेतला आणि ती दुसरी उपविजेती ठरली.

# आई, पत्नी अन् आता तरुणी मुलीची भूमिका साकारणार सायली!



टीव्ही अभिनेत्री सायली साळुंखे पुकार दिल से दिल तक या मालिकेत दिसणार आहे. यापूर्वी तिने पत्नी आणि आईची भूमिका साकारली आहे. आता ती मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे. यासाठी ती खूप उत्सुक आहे. याआधीही तिने पडद्यावर आईची भूमिका साकारली होती. वेगवेगळ्या प्रकारची पात्रे साकारून प्रेक्षकांना चकित करण्याची प्रत्येक कलाकाराची इच्छा असते. त्यामुळेच टीव्ही अभिनेत्री सायली साळुंखे तिच्या पुकार दिल से दिल तक या नवीन शोमध्ये तिच्या भूमिकेबद्दल खूप उत्सुक आहे. सायली तिच्या मागील बातें कुछ अनकही सी या मालिकेत एक समजूतदार पत्नी आणि आईच्या भूमिकेत दिसली होती. या वेळी ती एका तरुण मुलीची भूमिका साकारत आहे. या मालिकेतील वेदिका या भूमिकेला सायली स्वतःच्या अगदी जवळची मानते. सायलीच्या म्हणण्यानुसार, मी माझ्या दोन मालिकांत अशा भूमिका केल्या आहेत ज्या तीस-पस्तीस वर्षांच्या प्रौढ मुलीच्या, एका मुलाची आई आणि या पात्रांच्या होत्या. माझ्यापेक्षा पूर्णपणे वेगळे होत्या. वेदिका ही २६ वर्षांची बबली मुलगी आहे. ती स्वतः आईपासून विभक्त झालेली मुलगी आहे. नुकताच अभ्यास पूर्ण केला. वेदिका सायलीच्या वैयक्तिक आयुष्यात जवळ असेल तर मग आव्हानात्मक भूमिका कोणती वाटते, याबद्दल ती म्हणाली, की खरे तर गेल्या दोन वर्षांपासून मी आईच्या भूमिकेत एवढी साचेबद्ध झाली आहे की ती मातृत्वाची शैली माझ्या वागण्यात आपोआप येते. मी कोणाशी बोलले तर आपोआप हो बेटा म्हणते. त्यामुळे स्वतःला त्यातून बाहेर काढून मुलीच्या भूमिकेत आणणे हे माझ्यासाठी आव्हान आहे.

### सायली टाईपकास्ट होण्यावर बोलली...



सतत आईची भूमिका साकारताना टाइपकास्ट होण्याची भीती वाटत नव्हती का? यावर सायली म्हणते, की टाईपकास्टचा मुद्दा असता तर मला ही भूमिका मिळाली नसती. दोन शोमध्ये सारख्या भूमिका करूनही जर निर्मात्यांनी मला ही भूमिका दिली असेल तर याचा अर्थ आता टाईपकास्ट असे काही राहिलेले नाही. मला स्वतःवर पूर्ण विश्वास होता की, पस्तीस वर्षांच्या आईची भूमिका साकारल्यानंतर मी कॉलेज पास झालेल्या मुलीचीही भूमिका करू शकते आणि बघा, मी ते करतेय, असे सायली म्हणाली.

**बॉलीवूड अभिनेत्री विद्या बालन सध्या खूप रील बनवत आहे आणि आता तिने ही सवय कशी आणि का लागली हेदेखील सांगितले आहे. आता ती येथे सतत तिच्या चाहत्यांचे मनोरंजन करत आहे.**

# विद्या बालनला लागलेय रिल बनवण्याचे वेड

विद्याने दोन वर्षांपूर्वी सोशल मीडियावर एन्ट्री केली होती. आता ती रील बनवत आहे. सोशल मीडियावर रील बनवण्याचा आणि व्हायरल होण्याच्या तिच्या अनुभवाविषयी बोलताना विद्या म्हणाली, की सुमारे दोन वर्षांपूर्वी मी लंडनमध्ये नियात या चित्रपटाचे शूटिंग करत होते, त्यादरम्यान माझ्याकडे खूप वेळ होता. माझ्या व्यवस्थापकाने मला विचारले की आपण रील का बनवत नाही. त्यानंतर तिने गंमत म्हणून ही रील बनवली. ती रील इतकी व्हायरल झाली की विद्याला मग रीलबद्दल आकर्षण वाटू लागले. आता तर ती रीलच्या जणू प्रेमात पडल्यात जमा आहे. ती तिच्या चाहत्यांचे मनोरंजन करण्यासाठी सोशल मीडियावर सतत रील बनवत आहे. इन्स्टाग्रामवर ९.४ दशलक्ष फॉलोअर्स असलेली ही अभिनेत्री म्हणाली, की मी एक-दोन महिन्यात रील बनवत असे. माझ्याकडे रील शूट करण्यासाठी वेळ होता आणि मी फक्त मजा करत होते. जेव्हा ते व्हायरल झाले तेव्हा मला समजले की मला जे आवडते ते मी केले आणि लोक त्याचा आनंद घेत आहेत. म्हणून मी ते नियमित करू लागले. शिर्षा गुहा दिग्दर्शित दो और दो प्यार या रोमँटिक कॉमेडी चित्रपटात विद्या शेवटची पडद्यावर दिसली होती. यात प्रतीक गांधी, इलियाना डिक्रूझ आणि सेंधिल राममूर्ती यांच्याही भूमिका आहेत. विद्या लवकरच भूल भुलैया ३ या आगामी चित्रपटात दिसणार आहे. ती पुन्हा एकदा मंजुलिकाच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. या चित्रपटात विद्यासोबत कार्तिक आर्यन आणि तृप्ती डिमरी देखील दिसणार आहेत. २००७ मध्ये रिलीज झालेला भूल भुलैया पार्ट वन प्रियदर्शनने दिग्दर्शित केला होता. त्यात अक्षय कुमार, शायनी आहुजा, अमिषा पटेल, परेश रावल, राजपाल यादव, मनोज जोशी, असरानी आणि विक्रम गोखले यांचाही समावेश होता. हा चित्रपट ३२ कोटी रुपयांच्या छोट्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. पण २००७ चा आठवा सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट म्हणून उदयास आला होता. या चित्रपटाने जगभरात ८२.८३७ कोटी रुपयांची कमाई केली होती.



# मलायका अन् अर्जुन कपूरमध्ये सर्वकाही अलबेल!; ५ वर्षांपासून देताहेत एकमेकांना साथ

मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचे नाते तुटलेले नाही. हे आम्ही म्हणत नसून त्यांच्या मॅनेजरनेच तसे सांगितले आहे. मलायका आणि अर्जुनबाबत अशी चर्चा सुरू झाली होती, की दोघांत बिनसलेय आणि ते वेगळे होणार आहेत. पण वास्तवात दोघेही एकमेकांच्या प्रेमात खंबीरपणे उभे आहेत.

गेल्या काही दिवसांपासून मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांच्या ब्रेकअपच्या बातमीने अनेक चाहत्यांच्या जिवाला घोर लावला होता. ही बातमी पसरल्यापासून प्रत्येकजण त्यांच्या नात्याबद्दल अंदाज लावत आहे. मलायका आणि



अर्जुन अनेकदा लोकांसमोर येतात आणि एकमेकांसोबत पोज देतात. या जोडीला सर्वात हॉट जोडी देखील म्हटले जाते. २०१८ मध्ये दोघानी आपले नाते अधिकृतरित्या जाहीर केले होते. मलायकाच्या मॅनेजरने ब्रेकअपच्या अफवांचे स्पष्टपणे खंडन केले. हे बॉलीवूड जोडपे वेगळे झाले आहेत का, असे विचारले असता व्यवस्थापक म्हणाला, नाही, नाही, या सर्व अफवा आहेत. २०२२ मध्येदेखील त्यांच्या ब्रेकअपच्या अशाच बातम्या सोशल मीडियावर पसरल्या होत्या. मलायकासोबतचा फोटो पोस्ट करून अर्जुनने या बातम्यांवर प्रतिक्रिया दिली होती. तिने एका चिठ्ठीसह कॅप्शन दिले आहे की, संशयास्पद अफवांना जागा नाही. सुरक्षित राहा. आनंदी रहा. लोकांना शुभेच्छा द्या. आम्ही तुम्हा सगळ्यांवर प्रेम करतो...

## शॉर्ट न्यूज

### कामाचे पैसे मागितल्याने कोयत्याने मारहाण

■ **श्रीगोंदा :** जेसीबीच्या कामाचे २ हजार रुपये मागितल्याचा राग येऊन मुंगूसगाव येथील सुमारे १२ जणांनी विसापूर (ता. श्रीगोंदा) येथील तिघांना शिवीगाळ करत लाकडी काठीने तसेच कोयत्याने बेदम मारहाण करत गंभीर जखमी करून जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेत सुजित मोरे श्रीनाथ गाढवे, सागर मदने हे जखमी झाले. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात प्रथमेश जगताप याच्या फिर्यादीवरून सुचित इथापे, स्वप्निल कानगुडे, शिवम टकले, राहुल भोसले, सचिन धुमाळ, अनिकेत कानगुडे, अनिकेत गुडेकर, इंद्रजीत कर्डिले, वैभव टकले यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शेतकऱ्याला पाणी मिळण्यासाठी नियोजन करा

■ **निळवंडे :** धरणातून उच्चस्तरीय कालव्यांसह डाव्या आणि उजव्या कालव्यांचे पूजन करून पाणी सोडण्यात आले. ओव्हर फ्लोच्या पाण्याचा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रथमच लाभ होत आहे, ही अतिशय समाधानाची बाब आहे.लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्याला पाणी मिळेल, असे नियोजन करण्याच्या सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना आहेत. निळवंडे धरण स्थळावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत जलपुजन करण्यात आले.या प्रसंगी ते बोलत होते.

### पोलिस प्रशासनाकडून सत्कार समारंभ

■ **राहुरी :** पोलीस ठाणे येथील सहा. पो. नि. देवेंद्र सूर्यकांत शिंदे यांची पो. नि. पदी तर सहा. फौ. चंद्रकांत बऱ्हाटे यांची पो. उप नि. पदावर पदोन्नती झाली. स्पर्धा परिक्षेत घवघवीत यश मिळवून पोलिस उप निरीक्षक पदी निवड झालेले अभिजीत कटारे यांचा सत्कार समारंभ. तसेच पोलिस उप निरीक्षक पोपटराव कटारे, सहाय्यक फौजदार म्हातारदेव जाधव हे नियमित वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम राहुरी पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आला होता. यावेळी सत्कार केल्या बद्दल पोलिस अधिकारी व आयोजकांचे आभार मानले.

### जिल्हा रुग्णालयासमोर धरणे आंदोलन

■ **नगर :** बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग व राज्य शासनाच्या विविध विभागात नोकरीत सवलती घेणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी भारतीय जनसंसदेच्या वतीने क्रांतीदिनी शहरातील जिल्हा रुग्णालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे, अशोक सब्बन, अर्शद शेख, बबलू खोसला, अशोक भोसले, जसवसंतसिंह परदेशी, पोपट साठे, बाळासाहेब पालवे, वीरबहादूर प्रजापती, डोंगरगणचे मा. सरपंच कैलास पठारे, राम धोत्रे, प्रकाश गोसावी, जयेश देवळालीकर आदी सहभागी झाले होते.

### बजरंग दलाच्या दोघांना चिरडण्याचा प्रयत्न

■ **संगमनेर :** गायींची वाहतूक करणाऱ्या वाहनाला बजरंग दलाच्या दोन कार्यकर्त्यांनी थांबण्याचा इशारा केला असता त्यांना वाहनाखाली चिरडण्याचा प्रयत्न केला. ही घटना औरंगपूर- गोगलगाव रस्त्यावर रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी आश्वी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रज्वल चौधरी आणि सागर चौधरी हे दुचाकीवरून निमगाव जाळी येथून औरंगपूरकडे जात होते. त्यांना औरंगपूर शिवारातील पाटालगत दोन गायी व चार वासरांची वाहतूक करताना टेंपो दिसला. टेम्पोला थांबण्याचा इशारा केला. चालकाने टेम्पो अंगावर घालून चिरडण्याचा प्रयत्न केला.

# ब्राम्हणीत शेतकरी मेळावा संपन्न

## डॉ.विखे पाटील कृषी महाविद्यालयाच्या वतीने आयोजन



**राहुरी : प्रतिनिधी**

**डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे ब्राम्हणी गावात शेतकरी मेळावा संपन्न झाला. डॉ. विखे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत सदरील मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे, प्रमुख व्याख्याते म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ कापूस सुधार प्रकल्पाचे सहाय्यक कीटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भचते तसेच वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ भाऊसाहेब पवार, स्किल इंडिया प्रोजेक्टचे मास्टर ट्रेनर अजय गवळी तसेच ब्राम्हणी गावाचे प्रगतीशील शेतकरी व उद्योजक सुरेश बानकर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून ब्राम्हणी गावाच्या सरपंच सुवर्णाताई बनकर, उपसरपंच गणेश तारडे, ग्रामसेवक श्रीकांत काळे, कृषि सहायक शुभम कदम, तलाठी जालिंदर पाखरे तसेच ग्रा. पं. सदस्य महेंद्र तांबे, पंडित हापसे, अनिल ठुबे, सोसायटीचे माजी चेअरमन प्रभाकर हापसे तसेच कृषी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. दांगडे, प्रा. पी. सी. ठोंबरे, प्रा. बी. व्ही. गायकवाड तसेच या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. नंदकुमार भुते यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापन याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. निसर्ग किडींचे संवर्धन करणे व जैविक शेतीकडे वळणे काळाची गरज आहे. कीटकांच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे आणि प्रकाश सापळे यांचे प्रात्यक्षिक दाखवून त्यांचा वापर कसा करावा, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क,गांडूळ खताचा अर्क, जिवामृत या सर्वांचा वापर करून सेंद्रिय शेतीकडे वळण्याबद्दलचे त्यांनी मार्गदर्शन केले.


स्किल इंडिया प्रोजेक्ट चे ट्रेनर अजय गवळी यांनी जैविक शेतीचे महत्व, वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ भाऊसाहेब पवार यांनी कपाशी पिकाचे व्यवस्थापन व उत्पादन तंत्रज्ञान यावर सखोल असे मार्गदर्शन केले. तसेच ब्राम्हणी गावाचे प्रगतीशील शेतकरी व उद्योजक सुरेश बानकर यांनी कृषी महाविद्यालयाच्या कृषी दूतांनी केलेल्या कामाचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मधुकर धोंडे बोलताना म्हणाले की, शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवावे. रासायनिक खतांचा कमीत कमी वापर करून सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे. तसेच सेंद्रिय शेतीचे महत्व सांगितले. शेती व्यवसायासोबत शेतीपूरक व्यवसाय देखील करणे गरजेचे असून एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करावा असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी दूत अरविंद काळे व आभार प्रदर्शन वृषभ गुगळे यांनी केले.

## वाचकांच्या लेखणीतून

### खरा तो एकची धर्म

तेव्हा मी माध्यमिक शाळेत आठवीत शिकत होतो. १९७१-७२ सालचा काळ असावा.
शाळेत वर्षातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होत असत. त्यावेळी गॅदरिंग हा शब्द गावी रूढ झाला नसावा. अन्यथा ते गॅदरिंगच होते.




माझ्या वरच्या म्हणजे नववीच्या वर्गात गोविंद लाळगे आणि ज्युलेखा पठाण हे दोन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी शिकत होते.
त्यांचा आणि माझाही गळा मधुर होता. माझ्यापेक्षाही त्या दोघांचा तर अधिकच मधुर होता.
शाळेत गरुड सरांना संवादिनी वाजविता येई. तसे हे सर म्हणजे हरहुन्नरी व्यक्तीमत्व होते. ते चित्रकलेचे शिक्षक होते. क्रीडा शिक्षकही होते. आम्हाला संस्कृत भाषाही शिकवीत. शाळेतली गाणी, नाटके, नकला बसवून घेण्यात त्यांचाच पुढाकार असे. अशा प्रकारे त्यांना सांस्कृतिक शिक्षक म्हटले असते तरी चालले असते! आता ते या जगात नाहीत!
गरुड सरांनी गोविंद, ज्युलेखा आणि मी अशा तिघांकडून सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पूज्य साने गुरुजींचे
**खरा तो एकची धर्म**
**जगाला प्रेम अर्पावे**
हे भक्तिगीत बसवून घेतले. गोविंद पुढे गात असे. ज्युलेखा आणि मी मागून त्याला कोरस देत असू. ज्युलेखाचा आवाज पातळ आणि उंच टिपेचा होता. तिच्याशी माझा आवाज मिळवून घेता घेता माझी दमछाक व्हायची! पण प्रत्यक्ष कार्यक्रमात गोविंदाचे गाणे मी पडू दिले नाही! आमच्या गाण्याला भरघोस टाळ्या मिळाल्या!!
पुढे दोनतीन दिवस माझा घसा बसला होता. मला नीट बोलताही येत नव्हते. बोलण्यासाठी फार कष्ट पडत.

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.


# पालकमंत्री राधाकृष्ण विखेंची मिसळ पे चर्चा!

## ■ ताक आणि जिलेबीचाही घेतला आस्वाद ■ कार्यकर्त्यांना दिला राजकीय कानमंत्र

**संगमनेर : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी तालुक्यावर चांगलेच लक्ष केंद्रीत केले असून आता कार्यकर्ते आणि नागरीकांसमवेत मिसळ पे चर्चा करीत त्यांनी शहरामध्ये सकाळीच येवून साधलेल्या संवादाची खमंग चर्चा सुरू झाली आहे.**

मागील आठड्यात मंत्री विखे पाटील यांनी सलग तीनवेळा तालुक्याचा दौरा करून तालुक्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांना सक्रीय होण्याच संदेश देतानाच विखे कुटूंबियांशी अनेक वर्षे जोडल्या गेलेल्या जुन्या जाणत्या जेष्ठ आणि तरुण कार्यकर्त्यांच्या भेटी घेवून संवादाच्या प्रक्रियेला अधिकच वेग दिला आहे.
या संवादाचा एक भाग म्हणूनच मंत्री विखे पाटील नवीन नगर मार्गावरील एका हॉटेलात येवून मिसळ खाण्याचा आनंद घेतला.निळवंडे येथे जलपूजन आणि पाणी सोडण्याच्या कार्यक्रमाला जाताना संगमनेर तालुक्यातील कार्यकर्ते याच हॉटेलमध्ये एकत्रितपणे मिसळ खाण्यासाठी थांबले असल्याचे मंत्री विखे पाटील




यांना समजले.कार्यकर्त्यांनी त्यांना मिसळ खाण्यासाठी येण्याचा आग्रह केला.

संगमनेर तालुक्यात येताच मंत्री विखे पाटील आपला वाहनांचा संपूर्ण ताफा त्यांनी या हॉटेलकडे वळवला आणि कार्यकर्त्या समवेत त्यांनी मिसळ खाण्याचा आनंद घेत त्यांनी तालुक्यातील राजकारणा बाबत काही टिप्सही दिल्या.संगमनेरची प्रसिध्द असलेली जोशींची जिलेबी त्यांनी आवर्जून मागून घेतली. जोशीच्या जिलेबी स्व.बाळासाहेब विखे पाटील यांची आवड होती अशी आठवण करून देत दिल्ली मधील अनेक नेत्यांना जिलेबी आवर्जून खाऊ घातल्याची आठवण आवर्जून सांगितली. मिसळ ताक आणि जिलेबी असा आस्वाद घेत मंत्री विखे पाटील यांनी साधलेल्या संवादाची खमंग चर्चा आता राजकीय वर्तुळात चांगलीच रंगली आहे.

मागील काही दिवसात सलग तीनवेळा मंत्री विखे पाटील यांनी तालुक्यात झंझावती दौरा केला.माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनीही गुंजाळवाडी येथे येवून विधानसभा निवडणुक लढविण्याबाबत सुतोवाच डॉ. सुजय विखे यांनी संगमनेर मधून निवडणूक लढविण्यासंदर्भात व्यक्त केलेल्या भावनांचा निश्चित विचार करून याबाबत महायुतीच्या नेत्यांशी चर्चा करण्याबाबत मंत्री विखे पाटील यांनी केलेली पुष्टी सुध्दा महत्वपूर्ण होती.
तालुक्यातील विकास कामांच्या उद्धटनाच्या निमिताने मंत्री विखे पाटील यांनी तालुक्यातील काही गावात तसेच शहरात लावलेली हजेरी आणि कार्यक्रमांना मिळालेला प्रतिसाद लक्षवेधी ठरल्याने विखे पाटील कुटूंबियांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात वाढवलेला संपर्क चांगलाच चर्चेचा विषय ठरला असताना आता त्यांच्या मिसळ पे चर्चेचा प्रयोग राजकीय दृष्ट्या लक्षवेधी ठरला आहे.

# श्रीरामपूरमध्ये गुटखा तस्करांवर पोलिसांचा छापा

## उंबरगाव - मातापूर रस्ता परिसरात कारवाई



**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील उंबरगाव-मातापूर रस्त्यावरील गुटखा पानमसाला विक्री करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेला गुटखा पानमसाल्याच्या गोण्या दोघे तिघेजण चारचाकी वाहनातून शेजारी लावलेल्या दुसऱ्या चारचाकी वाहनात टाकत होते. पथकाने चारचाकी वाहनासह तब्बल ९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यात तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले तर तीन आरोपी पसार आहेत.**

श्रीरामपूर तालुक्यातील उंबरगाव-मातापूर रस्ता परिसरात ही कारवाई झाली. याचवेळी पोलिसांनी तेथे छापा टाकून आरीफ महेबूब शेख, बाबा गफूर तांबोळी, कलीम रहीम शाह यांना रंगेहाथ पकडले. तेथून परवेज नवाब शेख हा पळून गेला आहे. पोलिसांनी आरोपींकडून गोण्यांमध्ये भरलेला केसरयुक्त पान मसाल्याचे तसेच तंबाखूच्या पुड्यांच्या गोण्या तसेच दोन चारचाकी वाहनांसह ३ मोबाईल असा एकूण ९ लाख १६ हजार ४६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पकडलेल्या आरोपींनी हा माल राहाता तालुक्यातील वाकडी येथील सद्दाम अकबर शेख तसेच बीड जिल्ह्यातील मोमीनपुरा येथील इकबाल शेख यांच्याकडून आणल्याचे सांगितले.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्टेबल भाऊसाहेब काळे यांनी श्रीरामपूर शहर पोलिसात फिर्याद दिल्यावरून आरोपी आरीफ महेबूब शेख (वय ३१, रा. येलमवाडी, जळगाव, ता. राहाता), बाबा गफूर तांबोळी (वय ४४, रा. अशोकनगर, ता. श्रीरामपूर), कलीम रहीम शाह (वय ३३, रा. पूनमनगर, शिर्डी, ता. राहाता) तसेच पसार असलेले परवेज नवाब शेख (रा. श्रीरामपूर), सद्दाम अकबर शेख (रा. वाकडी, ता. राहाता), इकबाल शेख (रा. मोमीनपुरा, जि. बीड) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(पान १ वरून)

### महायुतीची विधानसभेसाठी लगबग!

देवेंद्र फाडणवीस व अजितदादा पवार यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली राज्याचा झपाट्याने विकास होतो आहे. तालुक्यातही महसुल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खासदार डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लागली आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसारखी महत्वाकांक्षी योजना राज्य शासनाने जाहिर केली असून त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना वीज बिलात सुट देत शेतकरी हित जोपासण्यात आले आहे. लाडकी बहिण कौशल्य विकास योजनांसह इतर योजनांचा आढावा घेतानाच या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहचला किंवा नाही याची माहीती घेण्यासाठी कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे.
आगामी विधानसभा निवडणूकीसंदर्भात मतदारसंघातील महायुतीच्या भूमिकेविषयी या मेळाव्यात चर्चा करण्यात येणार असून या मेळाव्यास तिनही घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिंदे, थोरात, रोहोकले, कळमकर यांनी केले आहे.

### सोयाबीन व कापूस उत्पादकांना १ ते १० हजाराचे अर्थसहाय्य

यासाठी आपण विधानसभा सदस्य असताना कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्यास यश येऊन राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६.३४ कोटी तर कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १५४८.३४ कोटी अशा एकूण ४१९४.६८ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.
ज्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई पीक पाहणी अॅप अथवा पोर्टलद्वारे सोयाबीन व कापूस लागवडीची नोंद केली आहे असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसह्याकरिता
पात्र राहतील. ऑनलाईन प्रणाली व सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार लिंक्ड बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरणाच्या माध्यमातून अर्थसहाय्य जमा करण्यात येणार असल्याचे लंके म्हणाले.

पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी आपले संमतीपत्र व सामायिक खातेदार ना हरकत प्रमाणपत्र संबंधित कृषी सहाय्यकाकडे आधारकार्ड व बँक व आधार कार्डशी संलग्न मोबाईल नंबर सादर करण्याचे आवाहन खा. लंके यांनी केले आहेत.

### ओव्हरफ्लोचे पाणी मुळा उजव्या कालव्यात सोडा

मुळा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदी पात्रालगतची चल मालमत्ता, चीज वस्तू, वाहने, पशुधन, शेती अवजारेव इतर मनुष्य उपयोगी संसाधने सुरक्षित स्थळी स्तलांतरीत करावी. नदीपात्रात प्रवेश करू नये. कुठलीही जिवित व वित्त हानी होणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी केले आहे.






# टाकळी ढोकेश्वर येथे सौर प्रकल्प होण्यास ग्रामस्थांचा विरोध

**■ ग्रामस्थांना विश्वासात न घेता सौर प्रकल्पाचा ठराव बंद खोलीत ■ प्रकल्प होत असलेल्या ठिकाणी अनेक वृक्षांची तोड ■ वन विभागाचे सोयीस्कर दुर्लक्ष**



**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर येथील गायरानावर होत असलेला खाजगी सौर प्रकल्प होण्यास ग्रामस्थांनी विरोध दर्शवला आहे.या प्रकल्पाचा ठराव बंद खोलीत करण्यात आल्याचा तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी वृक्षतोड होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.**

टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतकडे गायरान असलेली तेवढीच जागाच उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी कचरा व्यवस्थापन तसेच गावातील जनावरे चरण्यासाठी राखीव जागा तेवढीच आहे. सौर प्रकल्प होण्यास टाकळी ढोकेश्वर गावचे उपसरपंच रामभाऊ तराळ, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडूंगे, ग्रामपंचायत सदस्य शुभम गोरडे युवा नेते बबलू झावरे अंकुश पायमोडे माजी सैनिक संजय खिलारी यांनी विरोध केला आहे त्या संदर्भातील पत्र व्यवहार जिल्हाधिकारी यांच्या सोबत करण्यात आला आहे पत्रामध्ये असे म्हटले आहे की मौजे टाकळीढोकेश्वर, तालुका पारनेर, जिल्हा - अहमदनगर येथील गट नंबर १४३९, १४४०, १४४१. या क्षेत्रात मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प या योजनेचे काम चालू आहे. सदर ठिकाणी या प्रकल्पाच्या मंजूरी आगोदर सदर ग्रामपंचायतीच्या गावचा कचरा व्यवस्थापन डेपोचे काम चालू आहे मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाचा ठराव हा ग्रामसभेत न घेता बंद खोलीत झालेला आहे.

सदरची जागा ही जर सौर प्रकल्पासाठी दिली गेली तर गावच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न उभा राहील तसाही तो आजही आहे. गावाच्या कडेला कचरा पडल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. साथीचे आजाराचे प्रमाण ग्रामस्थांमध्ये आढळू लागले आहेत तरी सदर प्रकल्प थांबवण्यात न आल्यास ग्रामस्त नाईलाजस्तव उपोषणाचा इशारा देत आहेत.

आदरणीय जिल्हाधिकारी साहेब आपणास विनंती आहे की सदर प्रकल्पास स्थगीती देण्यात यावी व समस्त ग्रामस्थ टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांचे आरोग्य सुरक्षित ठेवावे ही नम्र विनंती.. अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे प्रकल्प होण्यासाठी विरोध दर्शविण्यात आला असून ग्रामपंचायतची जागा विना मोबदला खाजगी प्रकल्पाला कशी देण्यात आली हा प्रश्न सुद्धा उपस्थित झाला आहे.

### सौर प्रकल्पाचा ठराव बंद खोलीत

**टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायततीने सौर प्रकल्पासाठी गायरानची जागा देण्यासंदर्भातील ठराव हा बंद खोलीत केला व या ठरावाच्या संदर्भात त्यांनी ग्रामस्थांना तसेच ग्रामपंचायत सदस्यांना अंधारात ठेवले असा थेट आरोपच ग्रामपंचायतवर रामभाऊ तराळ, दत्तात्रय निवडुंगे, शुभम गोरडे, अंकुश पायमोडे, बबलू झावरे, संजय खिलारी यांनी केला आहे.**

### वनविभागांचे दुर्लक्ष

**टाकळी ढोकेश्वर गायरानावर सौर प्रकल्प होत असून हा प्रकल्प होणाऱ्या जागेमध्ये शेकडो मोठे मोठे झाडे असून ते झाडे सुद्धा तोडण्यात आले आहे या संदर्भात वन विभागाची कोणतीही परवानगी घेतली गेली नाही वनविभागाने ही याकडे सरळ सरळ दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे वनविभागाला सुद्धा हाताला धरून ग्रामस्थांना विरोध करत बंद खोलीत ग्रामपंचायतचा ठराव घेऊन सौर प्रकल्प होण्यास मनमानी नेमका कोणाची हाच प्रश्न निर्माण झाला आहे.**

# जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात ग्रामस्वच्छता अभियान

**प्रत्येक रविवारी अभियान राबविण्याचा ट्रस्टचा निर्णय**

**निघोज : प्रतिनिधी**

**जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून रविवार दि.११ रोजी सकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात आली असल्याची माहिती ट्रस्टचे सल्लागार रुपेश ढवण यांनी दिली आहे.**



■ जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आली. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद सर व त्यांचे सहकारी.

यावेळी उपकार्याध्यक्ष वसंत कवाद सर, विश्वस्त शंकरराव लामखडे, रमेश आण्णा ढवळे, रोहिदास लामखडे, ॲड. ज्ञानेश्वर लामखडे, सल्लागार मंडळाचे सदस्य दिलीप लाळगे, गंगाराम वराळ, राजेंद्र ढवळे, नवनाथ लाळगे, मणिकर्णिका ज्वेलर्सच्या संचालिका शुभांगी लामखडे, ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे, राजू वराळ आदी उपस्थित होते.

प्रत्येक रविवारी सकाळी सहा ते आठ वाजता जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात ग्रामअभियान ग्रामस्वच्छता करण्याचा निर्णय ट्रस्ट वतीने घेण्यात आला असून या परिसरात कायमस्वरूपी स्वच्छता राहण्यासाठी हा सामाजिक निर्णय मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट पदाधिकारी, विश्वस्त मंडळ, व सल्लागार मंडळ यांनी घेतला असल्याची माहिती ढवण यांनी दिली आहे.

गेली दहा ते पंधरा वर्षांपासून या जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात मोठ्या प्रमाणात शासकीय निधीतून तसेच ग्रामस्थ , मुंबईकर मंडळ व भावीक यांच्या लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. जगप्रसिद्ध रांजणखळगे हा एक राज्याला अभिमान वाटावा अशाप्रकारे पर्यटन स्थळ असून या ठिकाणी दोन परदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक सातत्याने येत असतात. तसेच राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या माता मळगंगा देवीचे मंदिर गावकरी व भावीक यांनी लोकसहभागातून बांधले असून हा परिसर निसर्गरम्य होण्यासाठी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांचे प्रयत्न सुरू आहेत.

खासदार नीलेश लंके यांनी गेली दहा महिन्यांपूर्वी या ठिकाणी विधानसभा सदस्य म्हणून जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात पर्यटक निवास व भोजन कक्ष यासाठी जवळपास पाच कोटीचा निधी उपलब्ध करून दिला असून लवकरच याचे काम सुरू होणार आहे. खासदार, आमदार निधीतून निधी सातत्याने उपलब्ध होण्यासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात. तसेच येत्या पाच वर्षात या परिसराचा विकासाभिमुख विकास मोठ्या प्रमाणात होण्यासाठी सर्व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात असून या ठिकाणी बोटींग व्यवस्था, एक सुसज्ज बागबगीचा तसेच निसर्गरम्य परिसर होण्यासाठी प्रयत्न सुरू असून प्रत्येक रविवारी होणाऱ्या ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियान या सामाजिक उपक्रमात सेवाभावी संस्था, ग्रामस्थ, सहकारी संस्था, पत्रकार संघ यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट पदाधिकारी विश्वस्त मंडळ व सल्लागार मंडळ तसेच ग्रामस्थ यांनी केले आहे.

# पदावर नसतानाही झावरे पाटलांच्या कामांचा सिलसिला!

**चिंचोली येथे ५० लाख रूपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाचे भुमिपुजन**



**चिंचोली : प्रतिनिधी**

**कोणत्याही पदावर नसतानाही विविध गावांमध्ये विकास कामे मंजुर करून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांचा विकास कामांचा सिलसिला मात्र सुरूच आहे. चिंचोली येथे झावरे यांच्या माध्यमातून रस्त्याच्या कामासाठी ५० लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला असून त्याचे भूमिपुजन झावरे यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले.**

मा. आ. स्व. वसंतराव झावरे पाटील यांनी हयातभर सर्वसामान्यांच्या हितासाठी संघर्ष केला. विविध गावांमध्ये विकास कामांची गंगा पोहचवून लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य चोख पार पाडले. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांचे चिरंजीव जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील हे देखील सर्वसामान्यांच्या सुख, दुःखात सहभाग होत त्यांना आधार देण्याचे काम करत आहेत. विविध शासकीय कार्यालयात असलेल्या संपर्काच्या जोरावर त्यांनी विविध गावांमध्ये विकास कामांसाठी निधी मंजुर करून आणला असून पद नसतानाही काम करता येते हे झावरे यांनी कृतीतून सिध्द केले आहे.

काही महिन्यांपूर्वी चिंचोलीच्या भगत वाडा परिसरातील नागरीकांनी रस्त्याच्या कामासाठी निधी मंजुर करण्याची मागणी झावरे यांच्याकडे केली होती. ही मागणी उचलून धरत झावरे यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून या रस्त्याच्या क्राँक्रीटीकरणासाठी ५० लाखांचा निधी मंजुर करून आणला. झावरे यांनी नागरिकांची मागणी पुर्ण केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

भुमिपुजन समारंभास लोणीमावळयाचे सरपंच विलास शेंडकर, पुणेवाडीचे मा. सरपंच बाळासाहेब रेपाळे, शहाजी कवडे, अमोल रासकर, सतिश पिंपरकर, जयदिप पिंपरकर, मच्छिंद्र पिंपरकर, बन्सीभाऊ सातपुते, तुकाराम झंजाड, महेश झंजाड, मोहन पोळ, लहू सातपुते, भगत गुरूजी, अण्णासाहेब भगत, प्रदिप पिंपरकर, दत्ता झंजाड, नानाभाऊ सातपुते, विजू सोनवणे, प्रदीप झंजाड, गणेश पिंपरकर, नानूबाई भगत, राहूल पिंपरकर, तेजस सातपुते, माधव पिंपरकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# हर घर तिरंगा मोहिमेतून राष्ट्रवादास बळकटी - प्राचार्य डॉ. शरद पारखे



**अळकुटी : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने हर घर तिरंगा या मोहिमेद्वारे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांत प्रत्येक घरात व जनमनात तिरंगा व त्याचे महत्व पोहचविले आहे. तिरंगा हा आपले अस्तित्वाचे व राष्ट्राभिमानाचे प्रतीक आहे. हर घर तिरंगा या मोहिमेमुळे राष्ट्रवादास बळकटी मिळेल असे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या तयारी निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी पोपट सुंबरे यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा. संजय जाधव व सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. पांडुरंग उघडे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक व आभार प्रा. विशाल रोकडे यांनी केले.

# साथीच्या आजाराच्या प्रतिबंधासाठी औषध फवारणीची गरज

**ग्रामपंचायतीकडे ग्रामस्थांची मागणी**

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज आणि परिसरात मोकळ्या जागा मोठ्या प्रमाणात असल्याने गवत जास्त प्रमाणात वाढले आहे यामुळे डासांची संख्या मोठ्या प्रमाणात झाली असून दुपारी पाच ते रात्री उशिरापर्यंत डासांचा त्रास विशेष करूण गाव व परिसरात राहाणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणात होत असून यासाठी गाव व परिसरात औषध फवारणी करुन डास नियंत्रणासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याची मागणी निघोज ग्रामस्थांनी केली आहे.**



सध्या प्रत्येक गावात मलेरिया आणी डेंग्यू हे आजार मोठ्या प्रमाणात बळावत आहेत. गाव व परिसरात असणाऱ्या मोकळ्या जागांवर गवत मोठ्या प्रमाणात वाढले असून या डासांची उत्पत्ती मोठ्या संख्येने वाढली आहे. यामुळे मलेरिया व डेंग्यू आजार मोठ्या प्रमाणात होत आहेत. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायत यांनी एकमेकांशी समन्वय साधीत औषध फवारणी केल्यास डासांना प्रतिबंध बसू शकतो व या आजारांवर ग्रामस्थांना मदत होईल यासाठी ग्रामपंचायतने सहकार्य करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**डेंग्यू आणि मलेरिया या आजाराने ग्रामस्थ त्रस्त झाले असून निघोज गावची लोकसंख्या पंचवीस हजाराच्या आसपास आहे. खाजगी डॉक्टरकडे गोरगरीब रुग्णांना जाणे परवडत नाही. एका रुग्णाला साधारण चार ते पाच हजार रुपये खर्च येतो. निघोज येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे मात्र या ठिकाणी सर्व औषधे उपलब्ध होण्यासाठी आरोग्य केंद्रात असणाऱ्या दक्षता समिती सदस्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच गावातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आरोग्य केंद्रात जाऊन उपचार व औषधे यासाठी सातत्याने चौकशी करण्याची गरज असल्याची सुचना ग्रामस्थांनी केली आहे.**

# मळगंगा तिर्थक्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास

**उद्योजक विनोद नलावडे यांचे गौरोद्गार**



■ पुणे येथील मान्यवरांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट वतीने सत्कार करण्यात आला.

**निघोज : प्रतिनिधी**

**राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवी तिर्थक्षेत्र परिसराचा मोठ्या प्रमाणात मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास झाला असून मातेच्या आशिर्वादाचा महिमा राज्यात असल्याचे प्रतिपादन पुणे येथील उद्योजक विनोद नलावडे यांनी व्यक्त केले आहे.**

उद्योजक नलावडे, येरवडा पोलिस स्टेशनचे ए पी आय स्वप्नील पाटील, डॉ. किरण थोरात यांनी मळगंगा मातेचे दर्शन घेतले यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट वतीने त्यांचा सहसचिव विश्वास शेटे, विश्वस्त शंकरराव लामखडे, प्रगतीशील शेतकरी हौशाभाऊ शेटे व सामाजिक कार्यकर्ते गोविंद लामखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उद्योजक नलावडे यावेळी म्हणाले ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम लंके, उपाध्यक्ष वसंत कवाद सर, कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, संघटक रामदासशेठ वरखडे, सहसचिव विश्वास शेटे व विश्वस्त मंडळ यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली कारभार अतिशय कार्यक्षमपणे सुरू असून ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ चांगली साथ देत आहेत. निघोज परिसराचा विकास मोठ्या प्रमाणात होत असून यासाठी गावकऱ्यांचा चांगला समन्वय असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त शंकरराव लामखडे यांनी केले सहसचिव विश्वास शेटे यांनी आभार मानले.

# दशाबाई डोंगरावर आंबा, सिताफळ, शेवगा आणि अंजीराची लागवड!

**■ पारनेर पब्लिक स्कुलचा उपक्रम ■ इको क्लबच्या पर्यावरण संवर्धनास हातभार**

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरापासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या निसर्गरम्य दशाबाईच्या डोंगरावर पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी आंबा, सिताफळ, शेवगा आणि अंजीराच्या रोपांची लागवड करत इको क्लबच्या पर्यारण संवर्धनाच्या संकल्पनेस हातभार लावला. विविध प्रकारच्या बियांचेही यावेळी विद्यार्थ्यांनी रोपण केले.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात पारनेर पब्लिक स्कुलच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून या उपक्रमांतर्गत इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या सहलीचे दशाबाईच्या डोंगरावर आयोजन करण्यात आले होते.

निसर्गरम्य दशाबाईच्या डोंगरावर सहलीचे अयोजन करण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला.



### प्राचार्यांविषयी कृतज्ञता

**प्रांजल गाडे, श्रावणी काकडे, आदीती थोपटे, साईराज कडूस, आर्यन सुर्यवंशी या विद्यार्थ्यांनी आपण या बियांचे तसेच झाडांचे रोपण करून पुढच्या पिढीला रानमेवा मिळावा तसेच निसर्ग संवर्धन करून पर्यावरणास हातभार लागावा यासाठी विद्यालयाच्या वतीने हाती घेतलेला उपक्रम भावल्याचे सांगत प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी या सहलीचे आयोजन केल्याबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली.**

सहलीसाठी जाताना विद्यार्थ्यांनी विविध झाडांच्या बिया तसेच आंबा, सिताफळ, शेवगा व अंजीर या झाडांची रोपेही सोबत आणली होती. चार किलोमीटर अंतरावरील दशाबाईच्या डोंगरावर पोहचल्यानंतर तेथील निसर्गरम्य आल्हाददायी वातारणात विद्यार्थी सुखावले. विद्यार्थी तसेच शिक्षकांनी मिळून डोंगर परिसरात विविध झाडांच्या बियांचे रोपण केले तसेच विविध झाडांच्या रोपांची लागवड करून पर्यावरण संरक्षण, संवर्धनपुरक सुवचने लावत वृक्षांचे जतन करण्याचा संदेशही देण्यात आला.

संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांच्या प्रोत्साहानातून आयोजित करण्यात आलेली ही सहल यशस्वी करण्यासाठी प्रशांत साळवे, दत्तात्रेय काकडे, सोनू म्हस्के, औटी मामा, सोबले मामा यांनी विशेष परिश्रम घेतले.

### वनभोजनाचा आनंद

**डोंगर परिसरात बिया तसेच झाडांची लागवड करण्यात आल्यानंतर आल्हाददायक वातारणात विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आनंद लुटला. एकमेकांनी आणलेल्या विविध पदार्थ, चटण्या, लोणच्याचा आस्वाद घेत डोंगरावरील भोजनाचा आनंद अवर्णनीय असल्याच्या भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com